# नवी मुंबई महानगरपालिका

**प्रसिध्दीकरिता**

**दि. 31/5/2020**

## मॅटर्निटी, कोव्हीड व नॉनकोव्हीड रूग्णांसाठी स्वतंत्र रूग्णवाहिकांचे सुयोग्य व्यवस्थापन

नागरिकांना कोव्हीड 19 आजाराप्रमाणेच कोव्हीड व्यतिरिक्त इतर आजारांकरिता तसेच महिलांना मॅटर्निटीकरिता पुरेशा प्रमाणात रूग्णवाहिका उपलब्ध व्हाव्यात याकडे विशेष लक्ष देत महापालिका आयुक्त श्री. अण्णासाहेब मिसाळ यांनी रूग्णवाहिकांचे सुयोग्य व्यवस्थापन केले असून त्यावर नियंत्रणाकरिता पशूवैद्यकीय अधिकारी डॉ. वैभव झुंजारे यांचेकडे रूग्णवाहिका नियोजनाची जबाबदारी सोपविलेली आहे.

रूग्णवाहिकांच्या नियोजनामध्ये कोव्हीड 19 बाधित रूग्णांकरिता स्वतंत्र रूग्णवाहिका, कोव्हीड 19 बाधित रूग्णांच्या निकटच्या संपर्कातील व्यक्ती व कोव्हिड 19 संशयित व्यक्तींकरिता स्वतंत्र रूग्णवाहिका अशी संरचना केली आहे. कोव्हीड 19 करिता 19 रूग्णवाहिका कार्यरत असणार आहेत.

अशाचप्रकारे कोव्हीड 19 व्यतिरिक्त इतर आजाराच्या रूग्णांचीही काळजी घेत त्यांच्याकरिता 6 रूग्णवाहिका कार्यरत असणार आहेत.

त्याचप्रमाणे मॅटर्निटी प्रयोजना करिता प्रत्येक रूग्णालयास 1 याप्रमाणे 3 व परिमंडळ 1 व 2 साठी 2 अशा एकूण 5 रूग्णवाहिका कार्यरत असणार आहेत.

सध्या नवी मुंबई महानगरापालिकेच्या परिवहन उपक्रमातील 8 एन.एम.एम.टी. बसेसचे रूग्णवाहिकांमध्ये रूपांतर करण्यात आलेले असून आणखी 10 बसेसचे रूपांतरण रूग्णवाहिकेमध्ये करण्यात येत आहे.

याशिवाय आमदारांच्या स्थानिक विकास निधीमधून 3 रूग्णवाहिका घेण्याचा प्रस्ताव ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात आलेला आहे.

**सदर रूग्णवाहिकांचे नियोजन व्यवस्थित रितीने होण्याकरिता अद्ययावत जीपीएस तंत्रप्रणालीचा वापर करण्यात येत असून कोव्हिड 19 रूग्णांसाठी स्वतंत्र रूग्णवाहिकांची सुयोग्य व्यवस्था करताना इतर आजारांच्या रूग्णांची व प्रसूतीसाठी येणा-या महिलांची गैरसोय होऊ नये याकडे महापालिका आयुक्त श्री. अण्णासाहेब मिसाळ यांनी काळजीपूर्वक लक्ष दिले आहे.**

*******************************************************************************

# नवी मुंबई महानगरपालिका

**प्रसिध्दीकरिता**

**दि. 31 / 05 / 2020**

**● कोव्हीड - 19 नियंत्रण कक्ष ●**

**टोल फ्री क्रमांक :- 1800222309 / 1800222310** **हेल्पलाईन क्रमांक :- 022 - 27567060/61**

**फेसबुक :- @NMMConline** **ट्विटर :- @NMMConline**

---

**कोव्हीड - 19 प्रादुर्भाव प्रतिबंधासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने तातडीने करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने अहवाल**

- **आज बरे होऊन घरी परतलेल्या कोरोना पॉझिटिव्ह व्यक्तींची संख्या - 98**
- **एकूण बरे झालेल्या कोरोना पॉझिटिव्ह व्यक्तींची संख्या - 1346**
- **सद्यस्थितीत उपचार सुरु असलेली पॉझिटिव्ह व्यक्ती संख्या - 785**
- **क्वारंटाईन कालावधी पूर्ण केलेल्या व्यक्तींची संख्या - 21819**

| कोव्हीड - 19 : सांख्यिकी तपशील (दि. 31 / 05 / 2020 रोजी, सायं. 3 वा.पर्यंत अद्ययावत) |
|---|

| | |
|---|---|
| ● कोव्हीड - 19 चाचणी केलेल्या एकूण नागरिकांची संख्या | 11749 |
| आज पॉझिटिव्ह | 94 |
| एकूण पॉझिटिव्ह | 2204 |
| एकूण निगेटिव्ह | 8886 |
| तपासणी अहवाल प्रलंबित | 659 |
| ● आज बरे होऊन डिस्चार्जनंतर घरी परतलेल्या व्यक्ती | 98 |
| ● एकूण बरे होऊन घरी परतलेल्या व्यक्ती | 1346 |
| ● सेक्टर 14, वाशी - कोव्हीड केअर सेंटर येथील नागरिक संख्या | 67 |
| ● सेक्टर 3, सी.बी.डी. - कोव्हीड केअर सेंटर येथील नागरिक संख्या | 18 |
| ● इंडिया बुल्स, पनवेल - कोव्हीड केअर सेंटर येथील नागरिक संख्या | 271 |
| ● घरीच क्वारंटाईन असलेल्या व्यक्तींची संख्या | 9359 |
| ● क्वारंटाईन कालावधी पूर्ण केलेल्या व्यक्तींची संख्या | 21819 |
| ● डेडिकेटेड कोव्हीड हॉस्पिटल (सार्व.रूग्णा., वाशी) येथे दाखल व्यक्ती संख्या | 90 |
| ● कोव्हीड -19 मुळे आज मृत्यू संख्या | 03 |
| ● कोव्हीड -19 मुळे एकूण मृत्यू संख्या | 73 |

## नवी मुंबई महानगरपालिका

**कोव्हीड-19 अहवाल (दि. 31 मे 2020)**

**आज बरे होऊन डिस्चार्ज झालेल्या व्यक्ती - 98**

**बरे होऊन डिस्चार्ज झालेल्या एकूण व्यक्ती - 1346**

| अ.क्र. | विभाग | स्त्री | पुरुष | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | बेलापूर | 07 | 13 | 20 |
| 2 | नेरुळ | 03 | 09 | 12 |
| 3 | वाशी | 01 | 05 | 06 |
| 4 | तुर्भे | 08 | 17 | 25 |
| 5 | कोपरखैरणे | 08 | 08 | 16 |
| 6 | घणसोली | 03 | 06 | 09 |
| 7 | ऐरोली | 03 | 03 | 06 |
| 8 | दिघा | 01 | 03 | 04 |
| | एकूण | 34 | 64 | 98 |

**आज पॉझिटिव्ह नोंदीत रूग्ण संख्या - 94**

**एकूण पॉझिटिव्ह नोंदीत रूग्ण संख्या - 2204**

| अ.क्र. | विभाग | स्त्री | पुरुष | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | बेलापूर | 00 | 04 | 04 |
| 2 | नेरुळ | 02 | 04 | 06 |
| 3 | वाशी | 04 | 05 | 09 |
| 4 | तुर्भे | 01 | 03 | 04 |
| 5 | कोपरखैरणे | 15 | 17 | 32 |
| 6 | घणसोली | 06 | 05 | 11 |
| 7 | ऐरोली | 11 | 13 | 24 |
| 8 | दिघा | 00 | 04 | 04 |
| | एकूण | 39 | 55 | 94 |

## नवी मुंबई महानगरपालिका

**कोव्हीड-19 अहवाल (दि. 31 मे 2020)**

| अ.क्र. | पत्ता | वय | स्त्री/पुरुष |
|---|---|---|---|
| 1 | सेक्टर-14, वाशी, नवी मुंबई | 78 | पुरुष |
| 2 | सेक्टर-11, जुहुगांव, वाशी, नवी मुंबई | 42 | पुरुष |
| 3 | सेक्टर-11, जुहुगांव, वाशी, नवी मुंबई | 24 | स्त्री |
| 4 | सेक्टर-12 डी, कोपरखैरणे, नवी मुंबई | 34 | स्त्री |
| 5 | सेक्टर-12 डी, कोपरखैरणे, नवी मुंबई | 34 | पुरुष |
| 6 | सेक्टर-15, कोपरखैरणे, नवी मुंबई | 38 | पुरुष |
| 7 | सेक्टर-15, कोपरखैरणे, नवी मुंबई | 26 | पुरुष |
| 8 | सेक्टर-15, कोपरखैरणे, नवी मुंबई | 23 | स्त्री |
| 9 | सेक्टर-15, कोपरखैरणे, नवी मुंबई | 55 | पुरुष |
| 10 | सेक्टर-18, कोपरखैरणे, नवी मुंबई | 30 | स्त्री |
| 11 | सेक्टर-10, कोपरखैरणे, नवी मुंबई | 60 | स्त्री |
| 12 | खैरणेगांव, कोपरखैरणे, नवी मुंबई | 56 | स्त्री |
| 13 | बोनकोडेगांव, कोपरखैरणे, नवी मुंबई | 53 | पुरुष |
| 14 | सेक्टर-04, कोपरखैरणे, नवी मुंबई | 70 | पुरुष |
| 15 | सेक्टर-02, कोपरखैरणे, नवी मुंबई | 40 | पुरुष |
| 16 | सेक्टर-04, कोपरखैरणे, नवी मुंबई | 60 | पुरुष |
| 17 | सेक्टर-04, कोपरखैरणे, नवी मुंबई | 38 | पुरुष |
| 18 | सेक्टर-04, कोपरखैरणे, नवी मुंबई | 31 | स्त्री |

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | सेक्टर-04, कोपरखैरणे, नवी मुंबई | 05 | पुरुष |
| 20 | सेक्टर-08ए, ऐरोली, नवी मुंबई | 30 | स्त्री |
| 21 | सेक्टर-15, ऐरोली, नवी मुंबई | 54 | पुरुष |
| 22 | सेक्टर-15, ऐरोली, नवी मुंबई | 47 | स्त्री |
| 23 | सेक्टर-16, ऐरोली, नवी मुंबई | 24 | पुरुष |
| 24 | सेक्टर-16, ऐरोली, नवी मुंबई | 52 | स्त्री |
| 25 | सेक्टर-05, ऐरोली, नवी मुंबई | 41 | पुरुष |
| 26 | सेक्टर-05, ऐरोली, नवी मुंबई | 25 | स्त्री |
| 27 | कातकरीपाडा रबाळे, नवी मुंबई | 55 | पुरुष |
| 28 | कातकरीपाडा रबाळे, नवी मुंबई | 50 | स्त्री |
| 29 | ऐरोली गांव, ऐरोली, नवी मुंबई | 37 | पुरुष |
| 30 | ऐरोली नाका, ऐरोली, नवी मुंबई | 28 | स्त्री |
| 31 | दिघा, नवी मुंबई | 20 | पुरुष |
| 32 | नामदेवनगर दिघा, नवी मुंबई | 65 | पुरुष |
| 33 | बिंदुमाधवनगर दिघा, नवी मुंबई | 29 | पुरुष |
| 34 | सेक्टर-16, घणसोली, नवी मुंबई | 37 | पुरुष |
| 35 | घणसोली, नवी मुंबई | 30 | पुरुष |
| 36 | गावदेवीवाडी, घणसोली, नवी मुंबई | 62 | स्त्री |
| 37 | सेक्टर-1 वाशी, नवी मुंबई | 25 | स्त्री |
| 38 | सेक्टर-11 सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई | 27 | पुरुष |
| 39 | सेक्टर-11 सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई | 27 | पुरुष |
| 40 | सेक्टर-19 सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई | 35 | पुरुष |
| 41 | सेक्टर-26 सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई | 22 | पुरुष |
| 42 | सेक्टर-20 नेरुळ, नवी मुंबई | 29 | स्त्री |
| 43 | सेक्टर-20 नेरुळ, नवी मुंबई | 25 | पुरुष |
| 44 | सेक्टर-20 नेरुळ, नवी मुंबई | 23 | पुरुष |
| 45 | सेक्टर-20 नेरुळ, नवी मुंबई | 26 | पुरुष |
| 46 | सेक्टर-20 नेरुळ, नवी मुंबई | 43 | पुरुष |
| 47 | सेक्टर-10 नेरुळ, नवी मुंबई | 40 | स्त्री |
| 48 | सेक्टर-05 सानपाडा, नवी मुंबई | 38 | पुरुष |
| 49 | सेक्टर-04 सानपाडा, नवी मुंबई | 47 | पुरुष |
| 50 | सेक्टर-21 तुर्भे, नवी मुंबई | 40 | पुरुष |
| 51 | सेक्टर-21 तुर्भे, नवी मुंबई | 33 | स्त्री |
| 52 | कोपरीगांव वाशी, नवी मुंबई | 29 | स्त्री |
| 53 | कोपरीगांव वाशी, नवी मुंबई | 46 | पुरुष |
| 54 | कोपरीगांव वाशी, नवी मुंबई | 15 | स्त्री |

| | | | |
|---|---|---|---|
| 55 | पावणेगांव नवी मुंबई | 47 | पुरुष |
| 56 | सेक्टर-11 जुहूगांव वाशी, नवी मुंबई | 43 | पुरुष |
| 57 | सेक्टर-15, वाशी, नवी मुंबई | 30 | पुरुष |
| 58 | सेक्टर-09, कोपरखैरणे, नवी मुंबई | 31 | पुरुष |
| 59 | सेक्टर-12, कोपरखैरणे, नवी मुंबई | 49 | पुरुष |
| 60 | सेक्टर-09, कोपरखैरणे, नवी मुंबई | 26 | स्त्री |
| 61 | सेक्टर-09, कोपरखैरणे, नवी मुंबई | 28 | पुरुष |
| 62 | सेक्टर-10, कोपरखैरणे, नवी मुंबई | 46 | स्त्री |
| 63 | सेक्टर-10, कोपरखैरणे, नवी मुंबई | 07 | पुरुष |
| 64 | सेक्टर-10, कोपरखैरणे, नवी मुंबई | 15 | स्त्री |
| 65 | सेक्टर-18, कोपरखैरणे, नवी मुंबई | 27 | स्त्री |
| 66 | सेक्टर-01, कोपरखैरणे, नवी मुंबई | 34 | पुरुष |
| 67 | सेक्टर-19ए, कोपरखैरणे, नवी मुंबई | 29 | स्त्री |
| 68 | सेक्टर-19ए, कोपरखैरणे, नवी मुंबई | 52 | स्त्री |
| 69 | सेक्टर-19ए, कोपरखैरणे, नवी मुंबई | 12 | पुरुष |
| 70 | सेक्टर-19ए, कोपरखैरणे, नवी मुंबई | 60 | पुरुष |
| 71 | सेक्टर-19, कोपरखैरणे, नवी मुंबई | 45 | स्त्री |
| 72 | सेक्टर-20, कोपरखैरणे, नवी मुंबई | 52 | स्त्री |
| 73 | पाटीलआळी घणसोली, नवी मुंबई | 35 | पुरुष |
| 74 | ताराईनगर घणसोली, नवी मुंबई | 43 | स्त्री |
| 75 | चिंचआळी घणसोली, नवी मुंबई | 47 | स्त्री |
| 76 | सम्राटनगर नोसिलनाका, नवी मुंबई | 38 | स्त्री |
| 77 | सेक्टर-8 ऐरोली, नवी मुंबई | 71 | पुरुष |
| 78 | सेक्टर-8 ऐरोली, नवी मुंबई | 36 | पुरुष |
| 79 | सिध्दार्थनगर रबाळे, नवी मुंबई | 31 | पुरुष |
| 80 | रबाळेगांव, नवी मुंबई | 30 | स्त्री |
| 81 | सेक्टर-10 ऐरोली, नवी मुंबई | 50 | पुरुष |
| 82 | कातकरीपाडा रबाळे, नवी मुंबई | 30 | स्त्री |
| 83 | सेक्टर-2 ऐरोली, नवी मुंबई | 29 | स्त्री |
| 84 | सेक्टर-19 ऐरोली, नवी मुंबई | 44 | पुरुष |
| 85 | ऐरोलीगांव, ऐरोली, नवी मुंबई | 50 | पुरुष |
| 86 | ऐरोलीगांव, नवी मुंबई | 44 | स्त्री |
| 87 | ऐरोली, नवी मुंबई | 65 | पुरुष |
| 88 | ऐरोली, नवी मुंबई | 60 | स्त्री |
| 89 | ऐरोली, नवी मुंबई | 34 | स्त्री |
| 90 | सेक्टर-3 ऐरोली, नवी मुंबई | 45 | पुरुष |

| | | | |
|---|---|---|---|
| 91 | सेक्टर-1 ऐरोली, नवी मुंबई | 23 | स्त्री |
| 92 | सेक्टर-1 ऐरोली, नवी मुंबई | 58 | स्त्री |
| 93 | रामनगर दिघा, नवी मुंबई | 23 | पुरुष |
| 94 | चिंचपाडा ऐरोली, नवी मुंबई | 58 | पुरुष |

**बेघर, निराधार, मजूर, विस्थापित कामगार, गरजू नागरिकांना मदतकार्य (दि. 31/05/2020)**

| | |
|---|---|
| ● नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील गरजू मजूर, कामगार, विस्थापित कामगार, बेघर नागरिक, काळजी घेण्यास कोणी नसलेल्या दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक यांना महानगरपालिका स्थापित 17 कम्युनिटी किचन तसेच स्वयंसेवी संस्था, दानशूर व्यक्ती यांच्या सहयोगाने 2 वेळचे जेवण दिले जात आहे. | 12968 व्यक्ती |

- विभागवार निवारा केंद्र एकूण संख्या :- 18
- निवारा केंद्रातील एकूण नागरिक क्षमता :- 1850
- सद्यस्थितीत कार्यान्वित निवारा केंद्र संख्या : 03
- निवारा केंद्रातील एकूण नागरिक संख्या : 40
- नमुंमपा निवारा केंद्र, आग्रोळी, से.11, बेलापूर निवारा केंद्र नागरिक संख्या : 23
- नमुंमपा शाळा क्र. 12, से. 6, सारसोळे, नेरुळ निवारा केंद्र नागरिक संख्या : 06
- नमुंमपा निवारा केंद्र, घणसोली निवारा केंद्र नागरिक संख्या : 12
- नमुंमपा स्थापित कम्युनिटी किचन संख्या : 17

************************************************************************************

# नवी मुंबई महानगरपालिका

## प्रसिध्दीकरिता

दि. 31/5/2020

**कोव्हिड रूग्णांवरील उपचारासाठी आवश्यकतेप्रमाणे 80% बेड्स राखीव ठेवण्याचे खाजगी रूग्णालयांना निर्देश**
**कोव्हीड 19 रूग्णांवरील उपचारास नकार देणा-या डॉक्टर्स, नर्सेसवर मेस्मा अंतर्गत होईल कारवाई**

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दि. 21 मे 2020 रोजीच्या अधिसूचनेनुसार नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी रूग्णालयात एकूण वापरात असलेल्या बेड्स संख्येच्या 80 टक्के इतकी संख्या कोव्हीड 19 ने बाधित रूग्णांवर उपचार करण्याकरिता आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने आरक्षित करणेबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे.

तसेच या रूग्णालयातील कार्यरत डॉक्टर व परिचारिका व इतर कर्मचारी रूग्णालयातील आवश्यक सेवेसाठी कार्यरत राहतील. जे डॉकटर्स, परिचारिका व इतर कर्मचारी आवश्यक सेवेत कोव्हीड 19 रूग्णांवर उपचार करण्यास नकार देतील तसेच कामावर हजर राहणार नाहीत व आपले कर्तव्य बजावण्यास कसूर करतील अशा सर्व व्यक्तींवर मेस्मा (महाराष्ट्र आवश्यक सेवा देखभाल अधिनियम 2006 ) अन्वये कारवाई करण्यात येईल असे महापालिका आयुक्त श्री. अण्णासाहेब मिसाळ यांच्या वतीने निर्देशित करण्यात आले आहे.

************************************************************************************

# नवी मुंबई महानगरपालिका
## प्रसिध्दीकरिता

दि. ३१/५/२०२०

**कोरोनाबाधित मृत व्यक्तींच्या अंत्यदर्शनासाठी कुटुंबियांना पीपीई किट्सची महापालिकेमार्फत व्यवस्था**

कोव्हीड-१९ चा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने प्रभावी उपाययोजना राबविल्या जात असून यामध्ये दुर्देवाने एखाद्या कोरोनाग्रस्ताचा मृत्यू झाल्यास कोव्हीड १९ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात येतात. तथापि मृत व्यक्तींच्या कुटुंबातील व्यक्तींना त्यांचे किमान अंत्यदर्शन घेता यावे याकरिता सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

यामागे कुटुंबियांच्या मनातील भावना लक्षात घेत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने कोरोनाबाधित मृत व्यक्तीच्या घरी तातडीने ५ संरक्षित पीपीई किट्स घरपोच पोहचविले जाणार आहेत. त्याचप्रमाणे स्मशानभूमीतील कर्मचा-यांकरिता संरक्षित पीपीई किट्सचा साठा स्मशानभूमीमध्ये उपलब्ध ठेवण्यात आलेला आहे. मालमत्ता विभागाचे उपआयुक्त श्री. दादासाहेब चाबुकस्वार आणि संबंधित विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांचेमार्फत याविषयीची कार्यवाही केली जाणार आहे.

*************************************************************************************